"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका


कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)


॥ चरति चरतो भग : ॥

मूल्य रु. ५


| क्रमांक ३ | वर्ष : ४४ | ऑक्टोबर-डिसेंबर २०२२ |
|---|---|---|

BOOK PACKET

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80


TO,


**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.


## दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.संघ आणि
## दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी
## वार्षिक स्नेहसंमेलन -२०२२

### निमंत्रण पत्रिका

ज्ञातीतील सर्व बंधुभगिनींना नम्र विनंती आहे की आपण सर्वांनी ज्ञातीच्या येत्या वार्षिक स्नेहसंमेलनास उपस्थित राहून शोभा आणावी व कार्यक्रम यशस्वी करण्यास साहाय्य करावे.

प्रमुख पाहुण्या : विदुषी श्रीमती नीलिमा शशिकान्त नाडकर्णी

(यांचा परिचय मुखपत्रिकेच्या जानेवारी२०२२ च्या अंकात आला आहे.)

स्थळ : प्राचार्य बी. एन्. वैद्य सभागृह, आय.ई.एस् हायस्कूल , दादर (पू.)

दिनांक : रविवार २० नोव्हेम्बर २०२२, सायं. ४.१५ वाजता

### कार्यक्रम

- स्वागत गीत
- संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांची भाषणे
- प्रमुख पाहुण्यांचे मनोगत

●●● मध्यंतर ●●●

- विवाहाची सुवर्णजयंती ओलांडणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा सत्कार.
- एज्यु. सोसायटीतर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना श्रीमती नाडकर्णी यांच्या हस्ते बक्षिसे.

*स्नेह संमेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही.*
*याची कृपया नोंद घ्यावी.*

मारुती वि. दळवी
कार्याध्यक्ष-संघ

देवदास अ. नाडकर्णी
कार्याध्यक्ष-एज्युकेशन सोसायटी

## संपादकीय

**सरस्वती बाग, जोगेश्वरी येथील मुंबई उपनगरातील पहिल्या गणेशोत्सवाचे**
**१०० व्या वर्षात पदार्पण**
**✻ १०० वर्षांची सांस्कृतिक परंपरा !! ✻**

१०३ वर्षापूर्वी १९१९ साली जोगेश्वरी येथे सरस्वती बाग नावाने केजीएस हाऊसिंग सोसायटीची स्थापना झाली. त्यानंतर अवघ्या चारच वर्षांनी १९२३ साली सरस्वती बाग गणेशोत्सवाला सुरुवात झाली. कोणत्याही धार्मिक संस्थेची स्थापना ही भावनिक आणि सामाजिक बांधिलकीच्या विचारातून होते तशीच या मंडळाची देखील झाली. हेच ते मुंबई उपनगरातील सर्वात पहिले गणेश उत्सव मंडळ. ह्या वर्षी गणेशोत्सव मंडळाने १०० व्या वर्षात पदार्पण केले आहे. या गणेशोत्सवाला खूप मोठी सांस्कृतिक परंपरा आहे. महाराष्ट्राचे लाडके आणि आदरणीय व्यक्तिमत्व पु. ल. देशपांडे यांचं बालपण सुध्दा याच सरस्वती बागेमध्ये गेलं. येथील गणेशोत्सवामध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमांमुळे आपल्यातील कलागुणांना प्रोत्साहन मिळालं असं पुलंनी 'बालपणाचा काळ सुखाचा' या आपल्या लेखामध्ये लिहून ठेवलं आहे.

सोसायटीमधील सर्व वयोगटातील कलाकारांना प्रोत्साहन देण्याचे काम या गणेशोत्सवाद्वारे करण्यात येते. पूर्वापारपासून सोसाटीमधील अनेक मंडळी विविध कलागुणांमध्ये तरबेज होती. सोसायटी मधील गणेशोत्सवात सादर होणारा ऑर्केस्ट्रा, नाटके, नृत्य या कला व्यावसायिक कलाकारांनी सादर केलेल्या कार्यक्रमांपेक्षा उत्कृष्ट असायच्या. याशिवाय अनेक दिग्गजांच्या मैफिली येथे श्रीगणेश चरणी रंगल्या आहेत. विविध व्यावसायिक नाटकांचे प्रयोग सुद्धा श्रीगणेश चरणी झाले आहेत.

१०० वर्षापूर्वी हा गणेशोत्सव ज्या उत्साहाने सुरू झाला तेवढ्याच जोमाने आज सुद्धा नवीन पिढी हा उत्सव दणक्यात साजरा करीत आहे. उत्सवाला कुठलंही व्यावसायिक स्वरूप येऊ न देता आजसुध्दा हा सार्वजनिक उत्सव घरगुती वातावरणात आत्मीयतेच्या भावनेने साजरा केला जातो. दरवर्षी २ ते ३ फूटांची शाडूची श्रींची मूर्ती, त्याची सजावटसुध्दा पर्यावरणपूरक साहित्य वापरूनच केली जाते. गणपतीच्या कार्यक्रमात कुठलाही थिल्लरपणा न करता सामाजिक प्रबोधन करणारे कार्यक्रम केले जातात. शासनातर्फे आता पर्यावरण स्नेही गणेशोत्सव स्पर्धा घेतली जाते, २०१८ सालचा गृहनिर्माण संस्था या गटांमध्ये प्रथम पुरस्कार सरस्वती बाग गणेशोत्सव मंडळाला मिळाला आहे. पर्यावरण स्नेही गणेशमूर्ती, सजावट, ध्वनिप्रदूषण विरहित मिरवणूक आणि विसर्जन अश्या चार निकषांवर आधारित हा पुरस्कार दिला जातो, सरस्वती बाग गणेशोत्सव मंडळ या चारही निकषांवर सर्वोत्कृष्ट ठरले आहे.

या शतकी वर्षामध्ये विविध स्वरूपाचे सामाजिक कार्यक्रम करण्याचा मंडळाचा मानस आहे या १०० वर्षाचा आपला समृद्ध वारसा समर्थपणे पुढे नेण्यासाठी मंडळाची तरुण पिढी सज्ज आहे, तरी ह्यासाठी अधिक बळ आणि योग्य मार्ग दाखवावा हीच श्री गणेश चरणी प्रर्थना !!

१ ऑक्टोबर २०२२

द. ना. नाडकर्णी



### ठाणे मंचतर्फे एक दिवसाची सहल

दिनांक : रविवार ८ जानेवारी २०२३
आकार : रु ७५० (आपल्या बँकेच्या नौपाडा शाखा, खाते क्र. १८१६ मध्ये भरण्याची सोय)
स्थळ : नंतर कळविण्यात येईल.
बस प्रस्थान : ठाणे मुलुंड, जोगेश्वरी, माहीम

**संपर्क**

| सुरेश पालेकर | राजेश दिवेकर | गिरीश रेगे |
|---|---|---|
| ८९२८८५०१९३ | ९६१९३६२४६० | ९९२२९६८७२५ |

### ठाणे मंच आयोजित, ज्येष्ठांनी निवडलेल्या गाण्यांचा कार्यक्रम

**(पूर्वतयारीसाठी निवेदन)**

**७५ वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठांनी एक मराठी व एक हिन्दी गाणी लवकरांत लवकर आम्हाला कळविण्याची कृपा करावी. ज्या कलाकारांना या कार्यक्रमात भाग घ्यायचा असेल (वयाची अट नाही) त्यांनी आपली नावे आम्हाला कळवावी म्हणजे ज्येष्ठांनी दिलेल्या गाण्यांचा पर्याय ठरविण्यात येईल.**

**स्थळ : तेंडुलकर सभागृह, माहीम**
**तारीख : रविवार २६ फेब्रुवारी २०२३**
**वेळ : सकाळी ९.३० ते १.०० नंतर सुग्रास भोजन**

**कार्यक्रमाची सविस्तर रूपरेषा मुखपत्रिकेच्या जानेवारी २०२३ च्या अंकात देण्यात येईल.**

**संपर्क : वर निर्देशित केल्याप्रमाणे**

## प्रकाश झोत

**शतकवीर श्री. मधुकर देसाई यांचा संघ व एज्युकेशन सोसायटीतर्फे सत्कार**

विले पारले येथे राहणारे श्री. मधुकर शांताराम देसाई यांना २२ सप्टेंबर रोजी शतकवीर होण्याचे भाग्य लाभले. ते वार्धक्यामुळे अंथरुणाला खिळलेले असले तरी त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या मायेमॉगाने हा शुभदिन उत्साहाने साजरा केला. नेहमीच्या प्रथेनुसार आपला संघ व एज्युकेशन सोसायटीतर्फे मुखपत्रिकेचे संपादक द. ना. नाडकर्णी यांनी देसाईमामांच्या निवासस्थानी जाऊन स्मरणभेटी, पुष्पगुच्छ व मिठाई देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या व त्यांच्याकडून आशीर्वाद ग्रहण केले. देसाईमामांचे सुपुत्र श्री. शाम देसाई यांनी वडिलांच्या शंभरीप्रसंगी लिहीलेला एक हृदयस्पर्शी लेख याच अंकात अन्यत्र अंतर्भूत केला आहे.

**पुणे येथील सलील, शर्मिला व अतुल्य नाडकर्णी यांचे अमेरिकेत कराटे स्पर्धेत उज्ज्वल यश**

पुणे येथील सलील नाडकर्णी, शर्मिला नाडकर्णी व अतुल्य नाडकर्णी यांनी गॅटलीनबर्ग, टेनेसी, अमेरिका येथे दिनांक १५,१६जुलै रोजी झालेल्या 'ईशिनरियू हॉल ऑफ फेम' या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत भाग घेऊन एकूण चार चषके जिंकली.

'ईशिनरियू हॉल ऑफ फेम' या संस्थेने सलील नाडकर्णी यांचा हॉल ऑफ फेम मध्ये समावेश केला. हॉल ऑफ फेम मध्ये समावेश केले गेलेले, सलील नाडकर्णी हे पहिले भारतीय कराटेपटू आहेत.

सलील, शर्मिला व अतुल्य नाडकर्णी ह्यांनी एकूण प्रत्येकी ६,३,३ जागतिक अजिंक्यपद स्पर्धा जिंकल्या आहेत.

**कारवारचे सुपुत्र श्री. मनोज बाडकर पश्चिमेच्या किनारपट्टीच्या तटरक्षक दलाचे नवे महानिरीक्षक**

पश्चिम किनारपट्टी अंतर्गत दमण ते कन्या कुमारी पर्यंतच्या टापूच्या सुरक्षेचे सुकाणू आता एका कारवारकराकडे आले आहे. मूळ बाड गांवचे श्री. मनोज वसंत बाडकर यांनी तटरक्षक दलाच्या पश्चिम क्षेत्राचे महानिरीक्षक म्हणून १२ सप्टेंबर २०२२ रोजी पदभार स्वीकारला. ते सागरी प्रदूषण विरोधी क्षेत्रात कुशल आहेत. आशियातील पहिल्याच प्रदूषण नियंत्रण करणाऱ्या 'समुद्रप्रहरी' या महाकाय जहाजाचे त्यांनी सारथ्य केले होते.

श्री. बाडकर यांचे शालेय शिक्षण सेंट जोसेफ हायस्कूल येथे झाले होते. नंतर कॉलेज शिक्षण गव्हर्मेंट आर्टस अँड सायन्स येथे झाले. आय. आय. एम्. अहमदाबाद या प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या व्यवस्थापन क्षेत्रांतील संस्थेमध्ये त्यांनी व्यवस्थापनाचा अत्युच्च कोर्सही केला आहे. १८८७ मध्ये ते तटरक्षक दलामध्ये रुजू झाले. गेल्या ३६ वर्षाच्या संस्मरणीय



कारकिर्दीमध्ये त्यांनी अनेक महत्वाची पदे भूषवली. त्यांना 'तटरक्षक' पदकाने सन्मानित करण्यात आहे आहे. इंग्लंडमध्ये जाऊन त्यांनी वरिष्ठ दर्जाचे प्रशिक्षण घेतले आहे. एवढ्या उच्च पदावर राहूनसुध्दा त्यांची जन्मभूमीशी नाळ तुटलेली नाही. कारवार परिसरांतील अनेक धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्याशी ते निगडीत असतात. त्यांच्या पदोन्नतीबद्दल शुभचिंतन.

**चुकीची दुरुस्ती :** मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात 'अकल्पित' या कथा संग्रहाच्या संदर्भात लेखक डॉ. निनाद अनंत गंडभीर यांचा संपर्क नंबर चुकीचा छापण्यात आला होता. तो ९८२०१ ४९०९४ हा आहे.

**A name that spells its class !**

**WINOVER**

**CATERERS**

**Marriages, Thread Ceremonies, Engagement and Birthday Parties Etc.**

**WE DELIVER FOOD / SNACKS FOR PARTIES AT HOME**
**Take away and TIFFINS**
**Or opt for Ala-carte**
**Amchi food and Variety cuisines**
***ALL OVER MUMBAI-THANE-VIRAR***

**Call or Whatsapp for our take away menu**
**Vinod Kaval / Ashwini / Rupali**
**98208 43392 / 90048 41198 / 98923 00608**

**Shop No. 4, Andrea Apartment off Azad Road, Vile Parle East, Mumbai - 400 057**



# ‘भावनांजली’

## शान्ता झणकर

‘एक जून’ या दिवशी ‘शान्ता झणकर’ (पूर्वाश्रमींची शान्ता कंटक) म्हणजेच माझी मोठी बहीण हिचं अचानक निधन झालं, आणि मनात एक पोकळी निर्माण झाली. आईवडील नोकरीच्या गावी दूर असल्यामुळे लग्न होऊन मुंबईत आल्यानंतर, तसंच आई गेल्यानंतरही, आईच्याच मायेनं आम्हा धाकट्या दोन बहिणींना, आणि आमच्या मुलांना प्रेम देणारी ही आईचीच प्रतिमा होती !!

जावेलाही तिच्या आजारपणात बहिणींइतक्याच आपुलकीने आपल्या घरी आणणारी, सुनेच्या आईच्या दुखण्यातही तितक्याच आस्थेनं तिच्याकडे लक्ष देणारी अशी प्रेमळ जाऊ किंवा विहीण फारच थोड्यांना लाभत असेल !

संस्कृत(ऑनर्स) व मराठी घेऊन बी. ए. झालेली ताई शिक्षणातही अग्रेसर होती. पुण्याच्या ‘मॉडर्न हायस्कूल’ मधले श्री. दीक्षित किंवा कानिटकर सर, ‘फर्ग्युसन कॉलेज’ मधले प्रा. रा.श्री. जोग, आर. डी. वाडेकर सर किंवा ‘एस. पी. कॉलेज’ मधले प्रा. अरविंद मंगरुळकर सर या सर्वांच्याच दृष्टीने ती एक हुशार विद्यार्थिनी होती.

अत्यंत मधुर आवाजाची देणगी लाभलेल्या ताईने (वडलांच्या बदलीच्या नोकरीमुळे बेळगावला असताना) वयाच्या अवघ्या बाराव्यावर्षी तिथल्या ‘आर्ट सर्कल’च्या कार्यक्रमात गाऊन बक्षीस मिळवलं होतं ! ‘मॉडर्न हायस्कूल’मध्येही संगीत नाटिकात काम करून वाहवा मिळवली होती !

पण ‘फर्ग्युसन कॉलेजच्या’ गॅदरिंगमधले तिचे गाण्याचे कार्यक्रम हा ‘कळसाध्याय’ होता !

ह्या काळात त्या कॉलेजमध्ये असलेल्या काही व्यक्ती आजही तिने गायलेल्या त्या गाण्यांची आठवण काढतात.

‘तुझ्या प्रीतीचे दुःख मला, दावू नको रे’, हे गाणं कुणाला आठवलं, तर शास्त्रीय रागावर आधारलेलं ‘एरी आली पिया बिन’ हे गाणं कुणाच्या स्मरणात होतं ! आणि या गाण्याने तिला ‘बेस्ट सिंगर’ हा पुरस्कार मिळाला होता.

ताईचं अक्षरही सुंदर, अन् लेखनही सुंदर होतं. ‘मुखपत्रिके’त काही प्रसंगोचित लेख तिने लिहिले होते. पण ‘कविता लेखन’ ही तिची खरी आवड होती. ‘अशा बरसल्या धारा’ या संग्रहात तिच्या काही कविता प्रसिध्द झाल्या आहेत.

डॉक्टर असलेली मुलगी, सून, मुलगा, जावई ही पिढी, शिक्षणाबरोबरच नृत्यकलेत अत्यंत निपुण अशी नात, व फुटबॉलमध्ये यशस्वी असा नातू, इंग्लंडमध्ये राहूनही नृत्यकला जोपासणारी दुसरी नात आणि गोड गळ्याचा वारसा मिळाल्याने वैद्यकीय व्यवसाय करता करता संगीताचा अभ्यास व कार्यक्रम करणारी मुलगा–मुलगी यांच्या कलेतील यशाचाही आनंद घेत अखेरच्या वर्षात ताई तृप्त होती !

आदरणीय आणि अनुकरणीय अशा माझ्या प्रेमळ ताईला चिरशान्ती लाभावी, हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

**– नीलिमा श. नाडकर्णी,** माहीम – ९१६७७ ४५६२८



www.kccgoa.in




अप्रतिम निसर्गाने नटलेलं
सुखसमृद्धी

मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर,
मंगेशी, फोंडा- गोवा



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मनःशांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

फ्लॅटस् उपलब्धः 1 रुम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के

प्रॉजेक्ट मान्यताः गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्यः नामवंत वित्त संस्था

a Project by:
कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी

मुंबई ऑफिसः श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि:2683 3841/47/ 72. मोबाः 98336 36451
फॅक्सः 2683 3872 ई-मेलः kunalconstructiongoa@yahoo.in

गोवा ऑफिसः टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबाः 98209 33352, 98206 33321

गोवा साईटः 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

kunalconstructiongoa@yahoo.in GOA RERA NO: PRGO05180314

## आठवणींचा बकुळगंध

ठाणे रंगमंच्याच्या वर्धापन दिनाची आकर्षक स्मरणिका माझ्या वाचनात आली. अंकातील लेख वाचून मन सुखावले. अंकात आलेले लेख बहुतेक प्रौढ आणि अनुभवी लेखक अन् लेखिकांनी लिहीलेले आहेत. तरुण लेखकापेक्षा वार्धक्याकडे वाटचाल करणाऱ्यांचे फोटो पाहिले. मग थोडं वेगळ्या विषयावर लिहायला घेतलं.

जुलैला 'गुरुपैर्णिमा' येते. आपल्या जीवनाचा मागोवा घेताना अनेक 'गुरु' आठवतात. आपल्यावर संस्कार करणारे आईबाबा आपले आद्य गरु . आज 'गुरु'बद्दल लिहीण्यासाठी त्यांच्याकडूनच मला प्रेरणा मिळते. 'गु'अक्षराचा अर्थ अंध:कार अन् 'रु ' अक्षराचा अर्थ 'ज्ञानप्रकाश' होय.

मी 'गुरुगीता' वाचली होती अन् आज हा लक्षवेधक श्लोक आठवला.

ब्रम्हनंदम् परमसुखदम् केवलंज्ञानमूर्ति ।
द्वद्वागीतम् गगनसद्दशम् तत्वमस्यादिलक्ष्यम् ।
एकं नित्यं विमलचलम् सर्वधीसाक्षिभूतम् ।
भावातीतम् त्रिगुणरहितम्, सद्‌गुरु त्वं नमामि ।।

गुरु हा परमसुख देणारा दाता आहे. सर्वांना सांभाळून नेणारा आकाशासारखा निर्लेप आहे.

संगोपन, लालकौतुक अन् संस्कार करणारी पथम गुरु माता होय. आपले बोट धरून प्रसंगी कानउघाडणी करणारे अनुभवानंतर भावी जीवन सुरक्षित करणारे बाबा हे पण गुरु. ज्ञानार्जन अन् व्यवहार कुशल करणारे शिक्षक हे सुध्दा गुरु. भवसागरातून तरुण, मन:शांती देणारे आपले संत हे गुरु होय.

कबीर म्हणतात –

गुरु गोविंद दोऊँ खड़े ।
काके लागू पाय ।
बलीहारी गुरु आपनी ।
गोविंद दियो बताय ।

माझ्याही जीवनात अनेक संकटे आली. प्रत्येक संकटावर मात करण्याची जादू मला गुरुकडून शिकता आली. आज प्रामुख्याने मनात मानाचे मिळविलेले काही गुरु आठवतात. आईबाबांबद्दल लिहावे तेवढे थोडे ! मला स्वयंपाक कुशल घडवणारी माझी 'माई' आठवते. शाळेत असताना शास्त्र विषयात कमी मार्क मिळाले म्हणून पेपर फाडून घरी आल्यानंतर चार उपदेशाच्या गोष्टी सांगणारे 'शुकबाप्पा' मला आठवतात. नौदलात कार्यान्वित असणारे माझे पती रघुवीर उर्फ सुधाकर, यांच्याकडून जीवन कसे शिस्तबध्द असावे हे शिकले. अन् 'परोपकार' करण्यात आपले समाधान मिळते हे त्यांच्याकडून शिकले. गुरुवर्य सर्वोच्च न्यायाधीश 'पालेकरमामा' यांच्या संपर्कात आले. लोणावळ्याला वाहत्या पाण्याच्या



कठड्यावरून चालताना त्यांनी पाहिले आणि जवळ घेऊन म्हणाले असे धाडस करू नकोस. तोल, गेला असता तर वाहत्या कालव्यात बुडाली असतीस. जीवनात 'समतोल' राखण्याचा गुरुमंत्र त्यांच्याकडून मिळाला.

जीवनात भक्तीमार्गाकडे नेणारे अनेक संत आपल्याला परिचित आहेत. त्यांच्याबद्दल लिहायला गेले, तर एक ग्रंथ होईल. इतके मात्र खरे की गुरुनी दाखविलेल्या मार्गानी गेल्यास जीवन समृध्द होते. सर्वांभूती असलेले आत्मज्ञान ही जीवनाची अनुभूती म्हणजे साक्षात्कार होय. भरकटणाऱ्या मनाला शांती देणारा 'दीपस्तंभ' म्हणजे गुरु होय.

कबीर म्हणतात –

गुरुविन ज्ञान न उपजै, गुरुविन मिलै न मोष ।
गुरुविन लखै न सत्य, गुरुबिन मिटै न दोष ।।

आज माझा ' गुरुपौर्णिमे' निमित्त लेख मी समस्त जी. एस्. बी. बांधवाकडून 'गुरुवर्या' ना समर्पित करते.

**– कुंदा देसाई –** मो. ९८१९० ५२३१९

## २०२२ - २०२५ कालावधीसाठी नव्या कार्यकारिणी

### एन्. के. जी. एस्. बी. संघ

**कार्याध्यक्ष** : मारुती वि. दळवी
**कार्योपाध्यक्ष** : शिरीष दि. वाघ
**कार्यवाह** : उदय म. नाडकर्णी व वामन मं. नाडकर्णी
**खजिनदार** : राजीव दि. गायतोंडे व अरुण म. वाघ

**सभासद** : दीपक दे. कुलकर्णी, शिवानंद वा. कुलकर्णी, जीवन उ. तेलंग

### ठाणे मंच

**कार्याध्यक्ष** : मारुती वि. दळवी
**कार्योपाध्यक्ष** : सुरेश मं पालेकर
**कार्यवाह** : राजेश वि. दिवेकर
**खजिनदार** : गिरीश मु. रेगे

**सभासद** : दुर्गादास शं. रेगे, अश्विनी आ. वाघ, ज्योती कि. सुखटणकर, श्रीरंग म. कसबेकर

### मुंबई मंच

**कार्याध्यक्ष** : मारुती वि. दळवी
**कार्योपाध्यक्ष** : शैलेश मं. गायतोंडे
**कार्यवाह** : प्रसाद दु. गायतोंडे
**खजिनदार** : विवेक सु. कुलकर्णी

**सभासद** : उदय गो. कसबेकर, राजीव ना. बोरकर, रसिका शै. गायतोंडे, मिहीर र. तेलंग

# वार्धक्य

## कोणी लिहीलेले, ऐकलेले आणि स्वत: अनुभवलेले

* माझा ७५ वा वाढदिवस फार मोठ्या थाटाने साजरा केला गेला. सबंध सी. सी. आय. हॉल आरक्षित केलेला होता. एक प्रसिध्द वाद्यवृंद, सर्व प्रकारची उत्तमोत्तम सुरा आणि खाद्य पेयांची रेलचेल होती. समोरच्या पेटलेल्या ७५ मेणबत्या पाहुन माझे मन मात्र थोडे अशांत होते.

**पत्नी कानाशी कुजबुजली –**

''फक्त मेणबत्या मोजत बसू नकोस – त्यांचा प्रकाश बघ ! ''

* दुपारी वर्तमानपत्र वाचता वाचताच जरा डुलकी आली. पण मन आपल्याच विचारांत होते. अचानक जाग आली. समोर माझी पत्नी मंगलापण कुठल्यातरी गहन विचारांत होती. दोघांच्या मनांत एकच विचार घोळत असावा. कालच तिचा ८० वा वाढदिवस साजरा केला होता, हताश होऊन उद्‍गारली – '' संपलं आपलं'' ! दोघांची नजर त्याचवेळी वर्तमानपत्राकडे गेली. कोविडचा शिकार बनलेल्या एका ४० वर्षे वयाच्या तरुणाचे चित्र होते. आपली बायको, दोन गोजिरवाणी मुलं, वृध्द आईवडील यांना वाऱ्यावर सोडून या कोवळ्या वयांत तो जग सोडून गेला होता.

काहीही न बोलता देवघराच्या दिशेने शांताईला आम्हा दोघांचे हात जोडले गेले.

कधी कधी तरुणांना खेळताना बघून स्वत:च्याही जवानीची आठवण येते. कॉलेज मधील दिवस आठवतात. सुंदर पोरी जेव्हा माझ्याकडे कौतुकाने बघत तेव्हा माझी छाती, माझ्या नकळतच, दोन इंचतरी फुगत असावी. आणि आता–कुठल्याही स्त्रीने जर माझ्याकडे जरा निरखून बघितले तर नकळतच माझे हात पँटची झीप उघडी तर नाही ना, हे चाचपून बघतात.

एकदा बाजारात वाईन/व्हीस्की वगैरेंचा महिन्याचा स्टॉक आणावयास गेलो होतो. सहज सर्व प्रकारच्या देशी–विदेशी वाईनच्या किंमतीची चौकशी केली अणि एक सत्य प्रकर्षाने आढळून आले आणि ते म्हणजे देशी–विदेशी कुठलीही वाईन जितकी जुनी– ''वयस्कर ''– तितकीच तिची किंमत जास्त, याचा अर्थ आमच्या वयाची वाईन जगात खूपच कमी लोकांना परवडण्या सारखी होती. मला वाटते, या वयांत सुध्दा, आपोआप दोन इंच जास्त फुगलेली छाती घेऊनच मी वाईन शॉपमधून बाहेर पडलो.

समवयस्क लोकांबरोबर एकदा टी. व्ही. पहातांना मी उद्‍गारलो–''काय रोमँटीक जोडी आहे ''! मंगलाने पण त्याला अनुमोदन दिले. समोर बसलेले गृहस्थ म्हणाले–'' अरुणराव वयाचे थोडं भान ठेवा !''



तेव्हांच आमच्या लक्षात आले की आम्ही वाजवीपेक्षा जास्त तरुण राहिलो.

वाढत्या वयाबरोबर पदरचे अनुभव आणि हुशारीचे गाठोडेपण वाढतच जाते. या आमच्या चेहऱ्यावर ज्या तुम्हाला सुरकुत्या दिसत आहेत, त्या सुरकुत्या नव्हेत तर हुशारी आणि अनुभव वाहिनी आहेत !

वयोमानाप्रमाणे एक फरक निश्चीतच जाणवतो आणि तो म्हणजे आपल्याबद्दल कोणी वाईट चिंतणारा नसावा. कोणाशीही शत्रुत्व, गैरसमज नसावेत, कोणाबद्दल वाईट चिंतणारे विचारही आमच्या मनात न यावे केवळ चांगल्याच आठवणी आणि उदात्त विचारच गाठीशी असावेत आणि हे सर्व गाठोडे मनात घेऊनच शांताईकडे जावे.

**– अरुण भास्कर कसबेकर :** मो.९८२०२ ९१ ३६५/८७७९९ ८६६०६

MSIPL MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD

402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital,
Andheri (West), Mumbai 400 058
Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444




*A little every month grows to something significant over time!!!*

*Invest Rs.1000/- Per month & get...*

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




*Indian Equity market has given average 16% return s in last 32 year s...*

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.



**श्रीमती स्मिता नाडकर्णी यांचे पाककलेवरील**
**'Smita's GSB Treasure'**
**नावाचे You tube channel**

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात श्रीमती स्मिता नाडकर्णी यांच्या एका पाककृतीचा तपशील दिला होता. त्यांचा हा दुसरा प्रकार त्यांच्याच शब्दांत

**२. भेंडी आणि कोळंबीची आमटी**

**साहित्य :** छोटी भेंडी पाव किलो. १ वाटी सोललेली कोळंबी, १ नारळ किसून, २ मध्यम कांदे चिरून.

**मसाला :** १० बेडगी मिरची, अर्धा चमचा हळद, १ चमचा धणे (टेबल स्पून वापरणे). हा मसाला पाणी घालून वाटून ठेवणे. अर्धे खोबरे व त्यात १० ते १२ मिरी, अर्धा कांदा घालून बारीक (गंध) वाटून घेणे. अर्ध्या खोबऱ्याचा जाड रस काढणे.

**कृती :** खोबरेल तेलावर कांदा बारीक चिरून फोडणीला टाकणे, ब्राऊन रंग झाल्यावर भेंडी चिरून टाकणे, एका भेंडीचे तीन तुकडे करावे व भेंडी परतून घ्यावी. त्यात कोळंबी व मिरचीचे वाटण घालून कोळंबी, शिजत घालावी. शिजल्यावर खोबऱ्याचे वाटण घालावे व मीठ घालावे. आंबटपणासाठी चिंच अथवा वटंब्याची सोले टाकावी. आमटी उकळल्यावर त्यात खोबऱ्याचा जाड रस टाकावा. जास्त उकळ न देता लगेच बंद करावी.

वरील कृती प्रत्यक्ष पाहण्यासाठी **'Smita's GSB Treasure' हे You tube channel** पहावे.

**–स्मिता अजित नाडकर्णी,** दहिसर – ९३२४३ ८३०२२

**☺ ☺ ☺ विजूले चुटकुले ☺ ☺ ☺**

घोव : अगॉ, मगेलॉ आणि तुगेलॉ ‘मास्क’ सारखोच आसा. ते वळकवचँ कशॅ ?

बायल : ससार आसा. ज्याका भीतल्यांन लिपस्टीक आसा तॉ मगेलॉ. ज्याका भायल्यात लिपस्टीक आसा तो तुमगेलॉ

नागेश : माका दिसता ‘लग्न’ म्हळ्यार एक जखमच आसा.

मंगेश : बरोब्बर, म्हण्णच ही जखम जावची पयलीच हळद लायतात.

– विजय सदानंद वागळे, ठाणे–९२२१६०७५७७





## सौ. दुर्गाबाई (गोदू) लक्ष्मीकांत वागळे
## *माझी शांत-प्रेमळ आई*

माझी आई दुर्गाबाई (गोदू) लक्ष्मीकांत (भानू) वागळे हिचे शनिवार १६-४-२२ रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी हृदयविकाराने आकस्मिक निधन झाले. आम्हां सर्वास पोरकं करून गेली. तिचे जाणे आम्हां सर्वांस चटका लावणारे होते. ती फक्त कुटुंबीयाशीच नव्हे तर सर्वांशीं मिळून मिसळून आनंदाने, प्रेमाने, वात्सल्याने वागत असे. आमच्या कुटुंबासाठी तिने केलेली मेहनत, घेतलेले त्रास प्रत्येकाने पाहिलेले आहेत, अनुभवलेले आहेत. आता तू देवाघरी अकस्मात निघून गेलीस. तू गेलीस तरी तुझ्या आठवणी मात्र आमच्या सोबत आयुष्यभरासाठी असणार आहेत. प्रत्येक क्षणी तुझी उणीव आम्हांस जाणवते, भासते.

कुमठा शानभाग कुटुंबातून तू श्री. लक्ष्मीकांत (भानू) वामन वागळे ह्यांच्याशी दि.१०-५-१९६३ ह्या दिवशी विवाह करून वागळे कुटुंबात प्रवेश करती झालीस. फार गरीबीत तू संसाराचा गाडा पुढे रेटलास. तुला २ मुली व १ मुलगा अशी ३ मुले. तीनहि मुलांना उत्तम प्रकारे शिक्षण देवून मोठे केलेस. तुला पप्पाकडून त्यांच्या शक्यतेनुसार त्यांच्या व्यवसायातून संसारासाठी अल्प असें साहाय्य मिळत असे. परंतु तू कधीच कशाबद्दलसुध्दा तक्रार करत नव्हतीस. सदा सर्वदा तू आनंदात रहायचीस. पहिल्यापासून तुला शेती करण्याची आवड होती. आमच्या घराच्या आसपास आमची शेती होती. स्वत: इतराबरोबर शेतात राबून आपली ती ईच्छा सुध्दा पूर्ण करून घेतली. गोठ्यात गाई-म्हशी पोसून दुग्ध व्यवसाय सुध्दा तू यशस्वीपणे केला. तू स्वत: धडाडीची नि कल्पक स्त्री होती. स्वत: तू शिवणकाम करायची. आम्हां तीनही मुलांची लग्ने तिने धुमधडाक्यात पार पाडली. ही सर्वांना थक्क करणारी, अचंबित करणारी गोष्ट आहे.

आई, तू गरीबांना संसार करण्यासाठी मदत केलीस व कधीच कुणालाही भुकें राहू लागणार नाहीं ह्याची काळजी घेत राहिलीस. सणासुदीच्या वेळी अशा गरजूंना पोळी वा अन्य गोडधोड करून वाटत होतीस. शेवटपर्यंत वाटून गेलीस ते सर्व लोक नि तुझ्या

सान्निध्यात आलेले सर्व जण तुझी आवर्जून आठवण  काढतात. तुझ्या मनात एक घर बांधायचे होते. ती तुझी ईच्छा सुध्दा तू पूर्ण केलीस. तू घरात आजकाल ज्या वस्तू आवश्यक आहेत त्या सर्व आणून ठेवल्यास. पण त्याचा उपभोग तुला फार दिवस घेता आला नाही ह्याची मला फार खंत वाटते.

तुला समाजसेवेची फार आवड होती. तुझ्या परीने बाडच्या घरातून तू करत होतीच शिवाय १९६२ तो १९७० ह्या काळात त्याच कारणाने कारवारच्या महिला मंडळाची सदस्य होतीस. पुढे तू येथेच स्व-सहाय संघाची स्त्री संघटना स्थापून त्या गरजू स्त्रियांना योग्य - मार्गदर्शन करून त्यांच्या गरजा भागविण्याचा प्रयत्न केलास. आम्हां सर्वांना तुझा सार्थ अभिमान वाटतो. तू अचानक आम्हां सर्वांना सोडून कायमची निघून गेलीस. माझी शांत, प्रेमळ, कर्तृत्ववान, सर्वांशी आपुलकीने वागणारी ''माझी आई'' आज आमच्या समोर नाही. आई ह्याचे आम्हाला कधीही भरून न येणारे दुःख आहे. पण देवाच्या इच्छेपुढे कुणाचेहि चालत नाही. तुझी आठवणच आम्हा सर्वांस पुढील जीवन जगण्याची प्रेरणा देत राहील. स्फूर्ती देत राहील.

ईश्वर तुझ्या आत्म्यास चिरशांति देवो हीच प्रार्थना !

**- राजेंद्र लक्ष्मीकांत वागळे**

**९४८०१५६५३९**


**SHREE HOMOEPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**


Laxmi Ratan Co-op. Hsg.,  Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016.  Mob. : 83560 24542 /  98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**

**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**



## शतकवीर
## श्री मधुकर शांताराम देसाई

I, Shyam Madhukar Desai would like to express  my feelings and gratitude towards my father Shri. Madhukar Shantaram Desai on his centenary year.

Madhukar Shantaram Desai was born in Karwar on 22nd September 1922. He has one younger brother Shri. Dhruvkant Desai (Dhruva now no more) and younger sister Indu Sakhardande. They lost their mother in their early childhood. My aajoba Shantaram Desai did not remarry and brought up his three children on his own and gave them good education.

After completing his graduation (BA) from Fergusson College, Pune my father joined Employees State Insurance Corporation of India in Mumbai. In 1949 he married Malini Mahadeo Wagle from Karwar. My mother passed away two years back at the age of 92.

My parents have three children. Myself, my elder sister Smt. Usha Subhash Vengsarkar and younger sister Smt. Pallavi (Suneeta) Shyam Wagle.

My father had a transferable job and was posted in different States like Karnataka, Tamil Nadu, Delhi etc. His major part of service was in Bangalore. So we settled there for our school and college education. Later all his three children came to Mumbai and settled here.

My father retired from Bangalore Office as Deputy Director, ESICE , Karnataka. After retirement he shifted to Chendiye, 8 kms from Karwar and stayed there for 20 years. He took interest in horticulture and grew Mangoes, Chickoos and coconuts. We used to visit there  in summer vacations and enjoy the beauty of village life.

After the age of 80 he had dementia and he came to live with me at Vile Parle, Mumbai. We have been blessed to have him around for the past 20 years.

My father was very cool headed as a parent. I have never seen him losing his temper or shouting. He gave us the best education, made us independent and imbibed good values in us. We all three myself (Shyam), Usha and Suneeta are very grateful to parents. We can't repay their love and care but I am happy that we can look after him now.

*- Shyam Madhukar Desai - 98201 02240*

## निधन

| | | |
|---|---|---|
| शुभा अरविन्द भट | (अंकोला) | वाळकेश्वर |
| रेखा रामानंद भट (पूर्वाश्रमीच्या रेखा मारुती (मता) बोरकर) | (कारवार) | उत्तराखंड |
| मोहन दत्तात्रय बोरकर | (कोडीबाग) | वांद्रे |
| अरविन्द बळवंत बोरकर | (कडवाड) | परळ |
| अशोक यशवंत दिवेकर | (कणसगिरी) | पुणे |
| अपर्णा आनंद कारापूरकर (पूर्वाश्रमीच्या आशा वसंत वागळे) | (बाड) | वडाळा |
| इंदिरा प्रेमानन्द कसबेकर | (कडवाड) | वाळकेश्वर |
| शांता मंगेश नाडकर्णी | (मल्लापूर) | वरळी |
| बाळकृष्ण (आपा) महारुद्र नाडकर्णी | (अंकोला) | बोरिवली |
| नंदकुमार (कुमार) व्यंकटराव नाडकर्णी | (अंकोला) | गोवा |
| मंगला शेषगिरी नाडकर्णी | (अंकोला) | अंकोला |
| अरविन्द लजपत नाडकर्णी | (सांवरपै) | पनवेल |
| अभय अनंत सुखटणकर | (होनावर) | पुणे |
| सीमा वसंत सुखटणकर | (हारवाडे) | पणजी |
| शैलजा अरुण सोहोनी | (गांवगेरी) | जोगेश्वरी |
| पुष्पा पद्माकर तेलंग | (नंदव्हाळ) | वांद्रे |
| शर्मिला नरायण तोरगल (पूर्वाश्रमीच्या सत्यप्रभा दत्तात्रय वाघ) | (सदाशिवगड) | माहीम |
| उषा विश्वनाथ वागळे | (हाणकोण) | माहीम |
| हीरा दत्तात्रय (बुचा) वाघ | (सदाशिवगड) | माटुंगा |



# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या (मागील अंकानंतर) उल्लेखनीय देणग्या

### श्रीमती शुभदा नेरुरकर यांजकडून एज्युकेशन सोसायटीस १ लाख रुपयांची देणगी

मागे मुखपत्रिकेच्या एका अंकात मुखपत्रिकेचे एक स्तंभलेखक श्री. अरुण भास्कर कसबेकर यांनी आपली आतेबहीण ''माझी अष्टपैलु सिंधूताई'' हा एक हृदयस्पर्शी लेख लिहिला होता. त्यांचा विवाह श्री. मारुती सोहिरोबा तेलंग याच्याशी झाला व सिंधुताईंचे स्नेहलता असे नामकरण झाले. त्यांच्या कन्या श्रीमती शुभदा नेरुरकर यांनी अलीकडेच आई वडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### श्री अरुण वागळे यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीस ५० हजार रुपयांची देणगी

पूर्वी जोगेश्वरी येथे श्रीमती शांताबाई व श्री. मारुती कृष्णराव वागळे यांचे वास्तव्य होते. त्यांचे वाळकेश्वर येथे राहणारे सुपुत्र श्री. अरुण वागळे यांनी आपल्या आई वडिलांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

### संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती शिल्पा प्रमोद रेगे यांजकडून | ३,५०० |
| २. | श्री. सच्चिदानंद नागेश नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी यांच्या स्मरणार्थ बंधु श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांजकडून | १०,००० |
| | नाती कु.सुदिप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून | १०,००० |
| ३. | श्री. मोहन शांताराम कसबेकर यांच्या ५०व्या पुण्यतिथी निमित्त 'अनामिके'कडून | १,००१ |
| ४. | श्री. दिलीप रघुनाथ गायतोंडे यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ नातवंडे कु अनन्या, तान्या आणि अव्यन यांजकडून | १०,००० |
| ५. | पूर्वजांच्या स्मरणार्थ पितृपक्षप्रसंगी अनामिकेकडून | ५,००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती स्नेहलता गोविंद कसबेकर यांच्या ८ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. विनय यांजकडून | ३,००० |
| २. | श्री. जिवबा नागेश सरदेसाई यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती आशा यांजकडून | २५,००० |
| ३. | श्री. वासुदेव जनार्दन कामत यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शांता यांजकडून | २५,००० |

## वृद्धसेवानिधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती सुमित्रा व श्री. मारुती (मता) शामराव बोरकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. शरद यांज कडून | १०,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती स्नेहलता व श्री. मारुती सोहिरोबा तेलंग यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शुभदा नेरुरकर यांच्याकडून | १,००,००० |
| २. | श्री. महारुद्र पुंडलीक कुलकर्णी यांच्या पहिल्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती प्रभा यांजकडून | २५,००० |
| ३. | श्रीमती इंदिराबाई व श्री. शंकर सदाशिव वागळे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. किशोर यांजकडून | ५,००० |
| ४. | श्रीमती शांताबाई व श्री. मारुती कृष्णराव वागळे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. अरुण यांजकडून | ५०,००० |
| ५. | श्री. रामदास काशिनाथ नाडकर्णी व पूर्वजांच्या स्मरणार्थ पितृपक्षप्रसंगी नाडकर्णी कुटुंबीयांकडून | ४,००१ |
| ६. | पूर्वजांच्या स्मरणार्थ पितृपक्षप्रसंगी श्री. मनोज गोविन्द भांडारकर यांजकडून | २,५०१ |



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.
(Multi-State Scheduled Bank)
Trusted over a Century

Multiple Rewardz in One Fixed Deposit



w.e.f. 19.04.2021

| | From 1 - 2 yrs | Above 2 - 5 yrs | Above 5 - 10 yrs |
|---|---|---|---|
| General Public | 5.60 % p.a. | 5.75 % p.a. | 5.85 % p.a. |
| Senior Citizen | 5.85 % p.a. | 6.00 % p.a. | 6.35 % p.a. |

- Higher Interest for Longer Period
- Choice of Monthly (Discounted) / Quarterly / Maturity Interest Payout
- Higher Yield over Card Rate on Interest Reinvestment Plan
- Instant Liquidity in case of urgency
- Convenient booking through our Quick Mobil App / Net Banking
- Avail Exciting Offers on FD / RD creation via Quick Mobil App
- Auto-Sweep facility available in multiples of INR 1000

T&C Apply.

Rates are applicable for Fixed Deposits in India only.

www.nkgsb-bank.com
Call us: 022 28602000

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.